विकास योजना अहिल्यानगर (वाढीव हद्द) आरक्षण क्र.२८० मधील प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर या कार्यालयाच्या नावे आरक्षित जागेचे भूसंपादन करण्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

परिवहन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०५२६/प्र.क्र. २०२/परि-४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक :- २१ जुलै, २०२६

<u>वाचा</u> :- परिवहन आयुक्त, मुंबई यांचे पत्र क्र. पआका/रवका/का-१०/नालेगाव/२०२५/ जा.क्र.१३३१५, दि.३१.१०.२०२५.

प्रस्तावना :-

विकास योजना अहिल्यानगर (वाढीव हद्द) आरक्षण क्र.२८० मधील मौजे नालेगाव स.नं .७० पै. खाजगी मालकी असलेले १.०० हे.क्षेत्र हे प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर कार्यालयाच्या नावे आरक्षित आहे. वाहन अटकावून ठेवण्यासाठी तसेच कार्यालयीन कामकाजासाठी सदर जागा प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर या कार्यालयास आवश्यक आहे. सदर आरक्षित असलेल्या जागेचे भूसंपादन करण्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

विकास योजना अहिल्यानगर (वाढीव हद्द) आरक्षण क्र.२८० मधील प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर कार्यालयाच्या नावे आरक्षित मौजे नालेगाव स.नं .७० पै. खाजगी मालकी असलेले १.०० हे.क्षेत्र जागेचे भूसंपादन करण्यासाठी अंदाजित रूपये १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर बाबीकरिता येणारा खर्च मागणी क्र.बी-१०, मुख्य लेखाशिर्ष ४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च (००) ८०० इतर खर्च, (००)(००)(०४) परिवहन कार्यालयासाठी भूसंपादन (योजनातंर्गत) (दत्तमत) (४०७००११३) ५०- इतर खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या अर्थिक वर्षाकरीता मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग पहिला, उप विभाग तीन, अनुक्रमांक ४, नियम क्रमांक २७ (२) अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२११२३०२७६४३९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL BABURAO APATE

Digitally signed by SUNIL BABURAO APATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=19FF433C24F38AC95F09EAA0A14F560224A1A78A80F8B9407 75FC013021CA5CA, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4EA86DEC92091A126823D249DF451DF3C8D235CDD7E 9111D7624C78A7C95B318, cn=SUNIL BABURAO APATE
Date: 2026.07.21 12:31:15 +05'30'

(सु.बा.आपटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
३) मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
४) अपर मुख्य सचिव (परिवहन) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई /नागपूर.
६) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सह परिवहन आयुक्त (प्रशासन/निरीक्षण), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
८) परिवहन उप आयुक्त (लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
९) प्रादेशिक परिवहन अधिकारी, अहिल्यानगर.
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर.
११) अवर सचिव/कक्ष अधिकारी (अर्थ-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती (परि-४).